# Module 2- प्रागैतिहास

**प्रास्तविक:-**

गतकाळातील मानवी प्रगतीचा आढावा म्हणजेच इतिहास होय. भूतकाळाच्या या इतिहासाचा किंवा ज्ञानाचा वर्तमानकाळाचे व्यवस्थित ज्ञान होण्यास उपयोग होतो. इतिहासाची पुनरावृत्ती होत नसली तरी इतिहासाच्या अभ्यासाद्वारे भविष्याला योग्य मार्गदर्शन होणे शक्य होते. या वेगळेपणामुळे व वैशिष्ट्यामुळे इतिहासाच्या अभ्यासाला सामाजिक शास्त्रांमध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे असे मानले जाते.

संशोधकांच्या मते, सूर्याची उत्पत्ती पाचशे कोटी वर्षांपूर्वी झाली. पृथ्वीची उत्पत्ती चारशे कोटी वर्षांपूर्वी झाली. जगातल्या पहिल्या सजीवाची उत्पत्ती (अमिबा) शंभर कोटी वर्षांपूर्वी झाली आणि आधुनिक मानवाचा उदय तीस हजार वर्षांपूर्वी झाला. त्याचे अवशेष जर्मनी, फ्रान्समध्ये सापडले त्यांना निअँडरथल (क्रोमॅग्नन) मानव असे म्हणतात. शास्त्रज्ञांनी त्यास होमोसिपियन अशी संज्ञा दिलेली आहे. नवीन उत्खननात पाच लाख वर्षांपूर्वीच्या पेकिंग मानवाचे अवशेष इंडोनेशिया व चीनमध्ये सापडलेले आहेत. मनुष्याला रानटी अवस्थेपासून प्रगत अवस्थेपर्यंत पोहोचण्यासाठी लक्षावधी वर्षांचा कालावधी लागला. उन्नत अवस्थेचा कालखंड केवळ सात हजार वर्षाचा आहे. त्यादृष्टीने मानवी संस्कृतीचे प्रागैतिहास व ऐतिहासिक असे कालखंड मानलेले आहेत. पहिल्या टप्प्यातील मनुष्य हिंसक, आक्रमक, अप्रगत, असंस्कृत व अल्प बुद्धीचा होता. निसर्गाशी टक्कर देत, निसर्ग शक्तींचा उपयोग करीत त्याने धीम्या गतीने प्रगतिशील जीवनाची वाटचाल सुरु ठेवली. पुढील काळात त्याने तांबे, कासे, लोखंड व कुंभाराच्या चाकाचा शोध लावला आणि पशुपालन व शेतीच्या माध्यमातून स्थिर जीवनाला सुरुवात केली. ह्या दीर्घगामी, प्रगमनशील उत्क्रांत अवस्थेलाच प्रागैतिहास किंवा अश्मयुगीन कालखंड असे म्हणतात.

युरोप, आफ्रिका, आशिया या खंडात लाखो वर्षांपूर्वी पाषाणांचे हत्यारे वापरणारा मानव वावरत होता. या आदिमानवाचा इतिहास केवळ उत्खननात सापडलेल्या हत्यारांच्या आणि अवजारांच्या साह्याने निवेदन करणे शक्य असल्यामुळे या युगाला अश्मयुग किंवा पाषाण युग असे संबोधले जाते. जुने अश्मयुग व नवे अश्मयुग असे याचे दोन विभाग पडतात. जुन्या अश्मयुगातील हत्यारे ओबडधोबड स्वरूपाची होती तर नव्या अश्मयुगातील अत्यंत सुंदर आणि परिणामकारक अशी होती.

प्रागैतिहासिक इतिहासाचे प्रादेशिक प्रदीर्घ व अखंडित इतिहासाचे विविध साधनांच्या साह्याने अध्ययन करणे शक्य झाले आहे. साधनांच्या स्वरूपानुसार इतिहासकाराला निरनिराळ्या शास्त्रांच्या आधारे या इतिहासाची उकल करणे शक्य होते. पुरातत्त्वीय साधनांच्या अभ्यासाला भूशास्त्र, स्तरशास्त्र, हवामानशास्त्र यांचा उपयोग होतो तर इतिहासकाळच्या साधनांचा अभ्यास भाषाशास्त्र, लिपीशास्त्र इत्यादींच्या मदतीने करणे शक्य होते. अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने मानवी इतिहासाचे प्रागैतिहास, आद्य इतिहास व ऐतिहासिक कालखंड हे तीन प्रमुख विभाग पाडले जातात.

**प्रागैतिहासिक कालखंड:- (Pre-historic Period)**

मानवी जीवनाचा असा कालखंड या कालखंडामध्ये मानवाचे जीवन रानटी व भटक्या स्वरूपाचे होते ; त्या काळातील मानव आपल्या अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तो निसर्गावर अवलंबून होता . मानवाला लेखन कला अवगत होण्याच्या अगोदर चा कालखंड म्हणजे प्रागैतिहासिक कालखंड होय. प्राचीन इतिहासात प्रागैतिहासिक कालखंडांचे स्थान मोठे आहे. 1851 मध्ये डॅनियल विल्सन यांनी सर्वप्रथम 'प्रागैतिहास' या संज्ञेचा वापर केला . डॅनियल विल्सन यांनी 1851 मध्ये The Archaeology and Prehistoric Annals of Scotland ग्रंथ लिहिला. ज्यामध्ये सर्वप्रथम प्रागैतिहास ह्या शब्दाचा उच्चारण केला. मॉर्टिमर व्हीलर यांनी प्रागैतिहासिक जगाच्या नकाशावर भारताचे नाव कोरले. ई .स. 1863 मध्ये रॉबर्ट ब्रूस फुट यांना मद्रास जवळील पल्लावरम येथे प्रागैतिहासिक/ पुराश्मयुगीन दगडी हात कुऱ्हाड मिळाली ज्यावरून भारतामध्ये प्रागैतिहासिक/ अश्मयुगीन संस्कृतीचे वास्तव्य असल्याचे पुरावे मिळाले. कालांतराने एच. डी. सांकलिया आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भारतभर उत्खनने आणि शोध प्रयत्न जारी केल्यानंतर अश्मयुगीन संस्कृतीचा सुसंगत असा इतिहास उपलब्ध झाला आहे.

प्रागैतिहासिक साधनांचा शोध लावण्याचे श्रेय डॉ. प्रिम रोझ या इंग्लिश शोधकाकडे जाते. त्यांना कर्नाटकातील रायचूर जिल्ह्यात लिंगसुगुर येथे 1842 मध्ये प्रागैतिहासिक काळातील काही दगडी अणुकुचीदार हत्यारे सापडली .त्यानंतर जॉन इव्हान्सने नर्मदा नदीच्या काठी जबलपूर येथे सापडलेल्या गारगोट्यांच्या हत्यारांची माहिती 1853 साली प्रथमतः प्रसिद्ध केली. पुढे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कर्नल मिडोज टेलर याने हैदराबाद जवळ उत्खननात सापडलेल्या महाअश्मकालीन दफनवस्तू संबंधीचा अहवाल प्रसिद्ध केला. उपरनिर्दिष्ट रॉबर्ट ब्रूस फूटने दक्षिण भारतात अनेक ठिकाणी अश्मयुगीन वस्तूंचा, हत्यारांचा शोध सातत्याने चालू ठेवला. त्यानंतर कृष्णा नदीच्या खोऱ्यात सापडलेल्या पाषाणयुगीन वस्तू संबंधीचा वृत्तांत 1930 मध्ये प्रसिद्ध केला .तसेच एच. डी. टेरा आणि टी. टी. पॅटरसन यांनी काश्मीर व पंजाब मधील हिमयुगाचा सूक्ष्म अभ्यास करून त्याचा पंजाब, नर्मदा खोरे व मद्रास येथील दगडी हत्यारांशी असलेला संबंध प्रस्थापित करणारे लेख 1935 मध्ये प्रसिद्ध केले, तरीही प्रागैतिहासिक काळाच्या जागतिक नकाशावर भारताचे स्थान निश्चित झाले नव्हतेच. ते काम मॉर्टिमर व्हीलर यांनी केले .त्यांनी प्रागैतिहासिक संस्कृतीचा संपूर्ण संगतवार इतिहास लिहून भारतातही प्रागैतिहासिकालीन संस्कृती होती हे ठामपणे सिद्ध केले .त्यावर आधारित स्टुअर्ट पिगॉट यांनी **"प्री- हिस्टोरिक इंडिया"** हा ग्रंथ 1950 साली प्रसिद्ध केला; तदनंतरच भारताचा प्रागैतिहासिक इतिहास विश्वासार्ह झाला.

चीन, आफ्रिका, जर्मनी, फ्रान्स व अन्य देशांच्या उत्खननामध्ये या काळातील मानवी अवशेष/ सांगाडे सापडले; परंतु भारतात मानवी अवशेष सापडले नाहीत. भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अश्मयुगीन स्थळांच्या उत्खननामध्ये सापडलेल्या दगडी हत्यारांच्या / अवजारांच्या अभ्यासावरून हा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाला आहे. मानव जीवनाच्या एकूण काळापैकी आज फक्त 0.1% माहिती इतिहासात आहे. प्रागैतिहासिक साक्षी भूमीच्यावर, गुफा आणि प्राचीन नदीच्या किनाऱ्यावर आढळतात. मानवाच्या शरीर अवशेषांबद्दलचे प्रथम विवरण इलाहाबाद जवळील सरायनाहर तसेच त्या जवळ बोगाइखोर आणि लेखनिया या ठिकाणी मध्य पाषाणकालीन उत्खननात आढळतात.

या पृथ्वीतलावर मानव साडेसतरा लाख वर्षांपूर्वी जन्माला आला असला तरी त्याला फक्त पाच हजार वर्षांपूर्वी लेखन कला अवगत झाली. यावरून आपणास प्रागैतिहासिक काळ किती मोठा आहे याची कल्पना येते. प्रागैतिहासिक काळात मानवाला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवनाची वाटचाल करावी लागली. तत्कालीन काळात पृथ्वीतलावर विशाल व विचित्र प्राणी, घनदाट जंगले, उंच उंच पर्वत, मोठे मोठे जलाशय होते . या काळात मानवाने विविध प्रकारच्या आयुधांचा वापर केला.

**प्रागैतिहासिक काळाच्या इतिहासाची साधने :-**

मानवाचे सांगाडे, प्राण्यांची हाडे व सांगाडे, दगडांपासून तयार केलेली हत्यारे आणि उपकरणे, खापराचे तुकडे, लाकडी व हाडांची हत्यारे ही प्रागैतिहासिक काळातील मानवी इतिहासाची साधने आहेत. प्रागैतिहासिक मानवाच्या अस्तित्वाची माहिती आपल्याला त्याने बनविलेल्या दगडी हत्यारांमुळे होते, त्यामुळे या युगास **अश्मयुग** असेही म्हणतात. गेल्या अनेक वर्षात देशात अश्मयुगीन संस्कृतीचे जे अवशेष मिळाले, त्यावरून भारतात अश्मयुगाचे खालील प्रमाणे कालखंड पाडता येतात.

इतिहासकारानी अश्मयुगाचे पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्मयुग असे अभ्यासाच्या सोईसाठी विभाग पाडले आहेत.

1. पुराश्मयुग:- इ. स.पूर्व 3 लाख वर्षे ते इ.स.पूर्व 8 हजार वर्षे (Palaeololithic Age)
2. मध्याश्मयुग:- इ.स. पूर्व सुमारे 8 हजार वर्षे ते इ.स. पूर्व 4 हजार वर्षे (Mesolithic Age)
3. नवाश्मयुग:- इ.स. पूर्व सुमारे 4 हजार वर्षे ते इ.स. पूर्व 1800 वर्षे (Neolithic Age)

4. <u>ताम्रपाषाण युग</u>:- इ. स. पूर्व सुमारे 1800 वर्षे ते इ.स. पूर्व 800 वर्षे (Chalcolithic Age)

5. <u>लोह युग</u>:- इ. स. पूर्व सुमारे 800 वर्षे ते इ.स. पूर्व 500 वर्षे (Iron Age)

**1. पूर्वाश्मयुग:- (Palaeolithic Age)**

पुराणाश्मयुगाचे पूर्व पुराणाश्मयुग, मध्यपुराणाश्मयुग, व उत्तरपुराणाश्मयुग असे हत्यारांच्या स्वरूपावरून भाग पाडले जातात. भारतात मात्र उपलब्ध होणाऱ्या दगडी हत्यारांच्या स्वरूपावरून व त्यातील बदलावरून अश्मयुगाचे पुराश्मयुग, मध्याश्मयुग, व नवाश्मयुग असे भाग पडतात . तसेच पुराश्मयुगाचा काळ हा भारतात इ. स.पूर्व 3 लाख वर्षे ते इ.स.पूर्व 8 हजार वर्षापर्यंतचा मानला जातो. या काळात अत्यंत कडक थंडी व तीव्र उष्णता असे विषम स्वरूपाचे हवामान होते. या हवामानात वारंवार बदल होत असत. या काळात मानवी जीवन भटके असून निसर्गात उपलब्ध होणाऱ्या दगडांचाच तो अन्न मिळवण्यासाठी व संरक्षणासाठी उपयोग करीत असावा. भारतात या काळातील मानवाचे हाडे किंवा हाडांचे सांगाडे सापडलेले नाहीत .तथापि, भारतातील बहुतेक नद्यांच्या काठी या काळातील मानवांच्या हत्यारांचे अवशेष मिळाले आहेत. या हत्यारांचे भारतात दोन प्रकार दिसतात. सोहन संस्कृतीची हत्यारे व ॲबेव्हिनियन किंवा शेलियन हत्यारे.

**भारतातील पुराश्मयुगीन मानवाची साधारणपणे पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात:**

1. पुरा म्हणजे प्राचीन, अश्मयुगाच्या सुरुवातीचा प्रदीर्घ कालखंड पुराश्मयुग म्हणून ओळखला जातो. पुराश्मयुगाचा कालखंड साधारणपणे इसवी सन पूर्व 3 लाख वर्षे ते इसवी सन पूर्व 8 हजार वर्षे असा मानला जातो.

2. पुराश्मयुगाच्या कालखंडामध्ये पृथ्वीवरील वातावरण अत्यंत विषम स्वरूपाचे असल्याचे आढळते. या वेळी अत्यंत कडक थंडी व तीव्र उष्णता वातावरणात होती. त्यामुळे या कालखंडामध्ये मोठे मोठे अजस्त्र प्राणी अस्तित्वात असल्याचे आढळून येते.

3. पुराश्मयुगीन मानवाचे जीवन भटके, रानटी व हिंस्र असल्याचे दिसून येते.

4. पुराश्मयुगीन मानवाच्या शरीराचे अवशेष अद्यापि उत्खननातून मिळालेले नाहीत.

5. मानवाने आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गात विपुल प्रमाणात मिळणाऱ्या ओबडधोबड दगडांचा उपयोग करून आपल्या गरजा पूर्ण केल्या.

6. प्राण्यांच्या शिकारासाठी गोल दगडांनी बनवलेल्या ओबडधोबड हत्यारांचा उपयोग त्यांनी केला.

7. या हत्यारांना कोर / फ्लेक प्रणालीची हत्यारे म्हटले जाते. ही हत्यारे क्वार्टझाईट या दगडाने बनवलेली दिसून येतात.

8. या मानवाचे वास्तव्य नद्यांच्या काठी झाल्याचे त्यांच्या उत्खननातील अवशेषांवरून समजते .

9.या मानवाला अग्नीचा वापर माहिती नव्हता.

10. कासव, कंदमुळे, फळे व प्राण्यांचे कच्चे मास यांचा मानव अन्न म्हणून उपयोग करत होता.

11. महाराष्ट्रातील बोरी, मध्यप्रदेश मधील भिमबेटका, आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात, बिहार पंजाब व काश्मिर या राज्यांमध्ये झालेल्या उत्खननांतून पुराश्मयुगीन मानवी संस्कृतीचे अवशेष प्राप्त होतात.

12. झाडांची पाने व प्राण्यांची कातडी चा उपयोग मानवाने थंडीपासून बचावासाठी केल्याचे दिसून येते.

13.कडाक्याची थंडी व प्राण्यांपासून बचावासाठी म्हणून निसर्गनिर्मित शिलाश्रयांचा वापर या मानवाने संरक्षणासाठी केल्याचे दिसून येते.

**2.मध्याश्मयुग (Mesolithic Age):-**

अश्मयुगीन संस्कृतीचा हा पुढचा प्रगत टप्पा होता. या युगाचे अवशेष राजस्थानमधील बागोर तसेच मध्यप्रदेशमधील भीमबेटका व आदमगड या ठिकाणी सापडलेले आहेत. भीमबेटकाच्या विंध्य पर्वतात मध्याश्मयुगीन शेकडो चित्रे आढळली. त्यातून तत्कालीन लोकसमूहाच्या जीवनावर प्रकाश पडतो.

त्यांना अग्नीचा वापर माहीत होता. ते मोठी मोठी दगडी घरे बांधून राहत व भाजलेले मासान्न खात. प्राण्याची शिंगे, दात व हाडांचा शिकारीसाठी व शस्त्रांसाठी ते वापर करू लागले. ते कातड्याची वस्त्रे व अस्थिदगडाचे दागिने वापरू लागले. त्यांना समूहजीवनाची गोडी लागली व ते भाषा बोलण्याचा प्रयत्न करू लागले. शिकारी प्रमाणेच प्राण्यांना माणसाळवून त्यांनी पशुपालनाला प्रारंभ केला.

आपले जीवन, भावना व विचार चित्रांमधूनच प्रकट करू लागले. प्रगत शस्त्रे, अग्नीचा उपयोग, दगडी घरे, भाषेचा वापर, समूहात्मक जीवन, मासेमारी, शिकार, पशुपालन आणि चित्रकलेचा अविष्कार ही मध्याश्मयुगीन जीवनाची वैशिष्ट्ये होती. इसवी सन पूर्व 8 हजार ते 4 हजार वर्षापर्यंत च्या कालखंडात मध्याश्मयुगीन संस्कृतीचा विकास झाला. त्यांनी प्रगतिशील जीवनाची वाटचाल सुरु केली होती.

मध्याश्मयुगातील हवामानात बराच बदल घडून आला. म्हणूनच पूर्वीचे अजस्र शरीराचे प्राणी मोठ्या प्रमाणात नाहीसे झाले व निरनिराळे लहान आकाराचे प्राणी निर्माण झाले असावेत. या काळातील मानव गुहा, प्रस्तरालये व उघड्यावर नदीकाठी राहू लागला असावा. या काळातील मानवाची लघुअश्मास्त्रे प्रामुख्याने गारेच्या दगडाची व लांब पात्यांची असत. ही हत्यारे तयार करण्याचे एक स्वतंत् तंत्र मानवाने आत्मसात केले असावे.

यासाठी प्रथम ज्या गोठ्याचे छलके काढावयाचे तो नीट तासून घेत .त्यानंतर टोकदार लाकडी दांडक्याने किंवा हाडाच्या तुकड्याने लहान लहान चिलके काढीत असत. वरून हातोड्या सारखा ठोका देण्यासाठी एक गोटा वापरीत व खाली ऐरणी सारखा एखादा दगड वापरला जाई. क्वचित एखाद्या प्राण्याच्या हाडाचा ऐरणीसारखा उपयोग करीत. गुजरातमधील मानवाने गेंड्याच्या खांद्याचे हाड ऐरणी सारखे वापरले होते व गोट्यापासून या काळात पाती, अर्धचंद्राकृती, त्रिकोणी , चतुष्कोनी इत्यादी प्रकारची धारदार हत्यारे बनवली होती. ही हत्यारे लहान असल्याने लाकडी दांडक्यात किंवा हाडाच्या तुकड्यात खाच पाडून त्यात डिंकाच्या सहाय्याने एकाशेजारी एक बसवीत. त्यामुळेच या हत्यारांचा सुरीसारखा कापण्यासाठी किंवा तुकडे करण्यासाठी उपयोग करता येत असे . काही अणकुचीदार टोकांच्या छिलक्यांचा बाणाग्रे म्हणूनही उपयोग केला जात होता.

मध्याश्मयुगाच्या काळात मानवाने हत्यारे बनविण्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर प्रगती केलेली दिसते. मध्ययुगातील हत्यारे बनवण्याचे तंत्र पूर्णपणे बदलले. या काळात हत्यारे बनविण्यासाठी पाते तंत्र, दाब तंत्र व टोला तंत्राचा वापर करण्यात आला. मध्याश्मयुगीन हत्यारांना **सूक्ष्मास्त्रे** म्हणून ओळखले जाते. मध्याश्मयुगीन मानवाने काळाच्या गरजेनुसार हत्यारे बनविण्याचे तंत्र बदलले व व विकसित केल्याचे दिसून येते.

**भारतातील मध्याश्मयुगीन मानवाची साधारणपणे पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात:**

1. मध्याश्मयुगाचा कालखंड इसवी सन पूर्व 8000 ते इसवी सन पूर्व 4000 वर्षापर्यंत मानला गेला आहे .
2. पुराश्मयुग व नवाश्मयुग या दोघांना जोडणारा संधिकाळ म्हणून मध्याश्मयुगाकडे पाहिले जाते.
3. मध्याश्मयुगात पृथ्वीवरील वातावरण पुराश्मयुगाच्या तुलनेने स्थिरावल्याचे दिसून येते , ज्यामुळे पूर्वीच्या हिंस्र , मोठ्या व अजस्र प्राण्यांच्या ऐवजी आता हरिण, चित्ता, कोल्हा ,लांडगा, डुक्कर व वाघ अशा चपळ प्राण्यांचा वावर पृथ्वीवर दिसून येतो .

4. मध्याश्मयुगीन या चपळ प्राण्यांची शिकार करण्यासाठी मानवाने आकाराने लहान अशा सूक्ष्म शस्त्रांची निर्मिती केली यांना **"सुक्ष्मास्त्रे"** असे संबोधले गेले. सुक्ष्मास्त्रे ही मध्याश्मयुगाचे प्रमुख वैशिष्टय म्हणुन ओळखले जाते.

5. सुक्ष्मास्त्रे ही जस्पर, एगत, चर्ट, सिडनी अशा दगडांनी बनवली गेली होती.

6. अन्नासाठी प्राण्यांच्या शिकारीवर मानवाचे जीवन अवलंबून होते.

7. मध्याश्मयुगीन सूक्ष्मास्त्रे बनवण्यासाठी मानवाने पाते तंत्र, दाब तंत्र व टोला तंत्राचा वापर दगडी हत्यारे बनवण्यासाठी केल्याचे दिसून येते.

8. मध्ययुगात मिळणाऱ्या सूक्ष्म अस्त्रांचा आकार रेखीवता व प्रमाणबद्धता उल्लेखनीय होती. पाती, बाणाग्रे, त्रिकोण, चतुष्कोण ही मध्याश्मयुगीन प्रमुख हत्यारे 1 ते 8 सेंटिमीटर इतक्या लहान पण प्रमाणबद्ध आकाराची होती.

9. उत्खननामध्ये मासे पकडण्याचे तांब्याचे गळ सापडले आहेत यावरून या मानवाला मासेमारीचे तंत्र अवगत असल्याचे दिसून येते.

10. या काळात उत्खननात थडगे सापडलेली आहेत ज्यामध्ये मानवाचा सहचर असलेल्या कुत्र्याला मानवाबरोबर दफन केल्याचे अवशेष मिळालेले आहेत.

11. या काळात प्राण्यांची हाडे व शिंगाचा वापर उपकरणे व हत्यारे बनवण्यासाठी केल्याचे दिसून येते.

12. मातीची ओबडधोबड भांडी या काळात बनवली गेली होती.

13. मध्याश्मयुगाच्या शेवटी मानवाने शेती करण्याचे तंत्र आत्मसात केल्याचे दिसून येते.

14. या मानवाने पशुपालनास सुरूवात केली.

15. राजस्थान, मध्यप्रदेश मधील भीमबेटका येथील प्राप्त गुहा चित्रांवरून यांच्या धार्मिक व सामाजिक जीवनाची माहिती मिळते. ज्यामध्ये शिकारीची चित्रेही प्राप्त होतात.

16. दक्षिण भारतात कर्नाटकातील उटनुर, पिकलीहाळ, मास्की, टेक्कलकोटा, नरसीपुर; आंध्रप्रदेश मधील ब्रम्हगिरी, नागार्जुनकोंडा ; पूर्व भारतात बंगाल ,बिहार, ओरिसा ,आसाम व महाराष्ट्रातील अहमदनगर मधील नेवासे, जोर्वे, इनामगाव येथे मध्याश्मयुगीन मानवाचे अवशेष सापडले आहेत. कश्मीर व झेलमच्या खोऱ्यात बुर्झाहोम येथे मध्याश्मयुगीन मानवी वसाहतीचे अवशेष विस्तृतपणे सापडली आहेत .

17. **बागोर** हे राजस्थानातील कोठारी नदीकाठचे ठिकाण म्हणजे मध्ययुगाची संस्कृती दर्शवणारे सर्वात मोठे ठिकाण समजले जाते. येथील उत्खननात या संस्कृतीचे तीन टप्पे दर्शविणारी रचना स्पष्ट झाली आहे .त्यात हिंस्र व पाळीव प्राण्यांची काळी पडलेली हाडे सर्वदूर सापडली आहेत. तसेच मानवी वास्तव्य दर्शविणाऱ्या झोपड्या, हत्यारे तयार करण्याच्या कारखान्यांचे अवशेष दृष्टोत्पत्तीस आले आहेत.

18. अलाहाबाद-प्रतापगड विभागातील सरायनाहर येथे विस्तृत उत्खनन झाले असून ही ठिकाणे या संस्कृतीतील लोकांची कायमची वसतिस्थाने असल्याचे दिसून येते. येथे मोठ्या चुली सर्रास दिसून येतात, त्यापैकी एक सार्वजनिक मोठी चूल आहे. तसेच प्रेताचे दफन

केलेल्या जागाही आहेत. उत्तर प्रदेशातील मोरहाना पहाडातील कातळाच्या छतावर एका घोड्याचा रथ व दोन घोड्याचा रथ सोबत धनुष्य बाण,भाले घेऊन चालत निघालेला माणसांचा जथ्था असे रंगीत चित्र चितारले आहे. मुंबईजवळ सूक्ष्मास्त्रांचा एक कारखाना 1950मध्ये सापडला आहे .

19. मध्याश्मयुगीन मानवाने शिकारीच्या हेतूने प्राण्यांना (कुत्र्याला) माणसाळवले.
20. मध्याश्मयुगातील प्राण्यांच्या हाडांचे काही अवशेष सापडलेले आहेत. त्यामध्ये मेंढी ,म्हैस ,कुत्रा , डुक्कर, कोल्हा, लांडगा ,चित्ता, सांबर ,बाराशिंगा , चिंकारा, हरीण, ससा , मुंगूस ,सरडा, कासव इत्यादी प्राण्यांच्या हाडांचे अवशेष सापडलेले आहेत .

3.**नवाश्मयुग :- (Neolithic Age)**

इसवी सन पूर्व पाच हजार वर्षापूर्वीच्या सुमारास नवाश्मयुगाचा प्रारंभ झाला. नवाश्मयुगाच्या कालखंड सामान्यतः इसवी सन पूर्व 4000 ते इसवी सन पूर्व 1800 मानला जातो . नवाश्मयुगाच्या काळात मानवी जीवनात झालेल्या महत्त्वपूर्ण बदलामुळे या काळाला क्रांतीयुग म्हणता येते. अन्न मिळवण्यासाठी भटकणारा मानव या काळात अन्नोत्पादक बनला. त्यांने शेती करण्यास सुरवात केली. त्यामुळेच त्याच्या जीवनाला स्थैर्य मिळाले.

धान्याच्या उत्पादनामुळे अन्नाचा साठा करणे शक्य झाल्याने अन्न मिळवण्यासाठी त्याला भटकण्याची गरज राहिली नाही. शेतीतून अन्नोत्पादन, जनावरांचा कामासाठी व मासांसाठी उपयोग, धान्य व पाणी साठविण्यासाठी मृदू भांड्यांची निर्मिती यामुळे मानवी जीवनात स्थिरता व सुबत्ता आली. या काळात बदललेल्या गरजांनुसार हत्यारां मध्येही बदल झाले. नवाश्मयुगात हत्यारे घासून गुळगुळीत व चमकदार केलेली असून ती धारदार कड असलेली असत. हत्यारांसाठी टणक, घट्ट व चांगल्या पोताचा दगड निवडला जात असे. प्रथम गोट्याला छिलके काढून, पाहिजे असलेला हत्यारासारखा आकार दिला जाई; टाके मारून गोट्याचा खडबडीतपणा काढून टाकीत. नंतर खडकाच्या खाचेत त्या हत्याराचे जे टोक धारदार करावयाचे ते दोन्ही अंगांनी घासले जाई. त्यामुळेच चमकदार व धारदार कड असलेले हत्यार तयार होत असे. या काळात शेतीसाठी कुऱ्हाडे, वाकस ही हत्यारे मानव तयार करीत. जंगल तोडून जमीन शेती करण्यायोग्य बनवण्यासाठी या हत्यारांचा उपयोग होई. याशिवाय सुतार काम तसेच धान्य कुटण्याच्या कामासाठी उपयुक्त असलेली हत्यारे या काळात बनविली जात.

जुन्या अश्मयुगाच्या काळापेक्षा नव्या अश्मयुगाच्या काळातील अनेक हत्यारे भारतात ठिकठिकाणी मिळतात. या काळातील मानवाचे हाडे किंवा सांगाडे अद्याप भारतात मिळालेली नाहीत .भारतात काश्मीर, दक्षिण भारत, पूर्व भारत व मध्य भारत या चार विभागात अश्मयुगीन अवशेष मिळतात.

**भारतातील नवाश्मयुगीन मानवाची साधारणपणे पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात:**

1. नवाश्मयुगाच्या कालखंड साधारणपणे इसवी सन पूर्व 4000 वर्षे ते इसवी सन पूर्व 1800 वर्षे असा मानला जातो.
2. नवाश्मयुगामध्ये मानवाचे भटके जीवन संपुष्टात आले .त्याने मातीच्या विटांचा किंवा मातीच्या गोळ्यांची छोटी निवासस्थाने बांधण्यास प्रारंभ केला.
3. तसेच घरांचा आकार चौकोनी व आयताकृती झाला.
4. या काळातील मानव उदरनिर्वाहासाठी शेती करू लागला, तरीही शिकार व मासेमारी त्याने सोडून दिलेली नव्हती. गहू, बार्ली व जवस यांचेही अवशेष उत्खननात सापडले आहेत.
5. अग्नीचा वापर व निर्माण करण्याची कला या मानवाने अवगत केली होती.

6. मृदू भांडी, मातीची सुबक भांडी बनवण्याची कला या मानवाने हस्तगत केली.
7. खाद्यवस्तू भाजण्यासाठी चूलींचा सर्रास उपयोग सुरू झाला.
8. शेळया, बैल, बोकड या प्राण्यांना माणसाळवून त्यांचे पाळीव प्राण्यात रुपांतर केले .
9. प्राण्यांच्या कातडीचा वापर थंडीपासून संरक्षणासाठी या मानवाने केला.
10. नवाश्मयुगात पूर्वीची दगडी सूक्ष्मास्त्रे लुप्त झाली आणि त्याऐवजी तांब्याची शस्त्रे दिसू लागली.
11. नेहमीच्या वापरातील कुराडे, टोकदार हत्यारे, हाडांची अस्त्रे ही हत्यारे घासून गुळगुळीत केली आणि त्याची कार्यक्षमता वाढवली.
12. या काळातील मानवांच्या धार्मिक श्रद्धांचा उदय, देवी देवतांची पूजा , पूर्वजन्म, पुनर्जन्म या व अशा कल्पनांचा प्रारंभ या माणसाने केल्याचे दिसून येते.
13. या काळात मानवाला चाकाचा शोध लागला
14. या काळातील मानवाची शैल- चित्रे बऱ्याच जागी मिळालेली आहेत .
15. कश्मीर जवळच्या बुर्झाहोम येथील एका दफन स्थळी मालकाबरोबर त्याचा कुत्रा आणि लांडगा हे पुरल्याचे अवशेष आढळले आहे.
16. येथे मातीच्या भांड्यावर तत्कालीन देवता समजत असलेल्या म्हशीचे चित्र रंगविले आहे.
17. दिशांचे हार, रत्नहार इत्यादी वस्तूंचा परदेशी व्यापार होत असल्याचे दिसून येते.
18. नवाश्मयुगीन वैशिष्ट्ये दर्शवणारी स्थळे भारतभर विखुरली आहेत. कर्नाटकातील उटनूर व ब्रह्मगिरी, काश्मीरमधील बुर्झाहोम, उत्तर प्रदेश मधील चेचर व हस्तिनापूर, बिहारमधील चिरंद , आसाम मधील हदंग, पंजाब मधील जालीपूर, अलाहाबाद मधील कोल्डीहवा तसेच मणिपूर, पश्चिम बंगाल ,मेघालय या ठिकाणी नवाश्मयुगीन संस्क्रतीचे अवशेष सापडले आहेत .
19. वशिंड असलेली बैलाची मातीची चित्रे, टोकदार हाडे, उभट भांडी, रत्नासारख्या दिसणाऱ्या चकचकित दगडांपासून तयार केलेले मणी, तांब्याची सूई व चाकू इत्यादी वस्तू उत्खननातून प्राप्त झाले आहेत.
20. तसेच ग्राम संस्कृतीची म्हणजेच गावांच्या वसाहतींची सुरुवात नवाश्मयुगात झाली होती.

**अश्मयुगातील जीवन:-**

**भारतातील अश्मयुगीन मानवाची साधारणपणे पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात:**

**1. सामाजिक जीवन:-**

पुराश्मयुगीन मानवाच्या जीवनाची माहिती आपल्याला तत्कालीन दगडी हत्यारावरूनच घ्यावी लागते. प्रारंभीच्या काळात मानव हा लहान लहान कळप करून राहत असावा, त्यामुळेच सामूहिकरीत्या प्राण्यांची शिकार करणे व संरक्षण करणे परस्पराच्या साह्याने मानवाला शक्य होत असे. मानव कळप करून राहत असल्यामुळे त्यांच्यात परस्परांबद्दल आपुलकीची भावना असावी असे दिसते. अशा रीतीने मानव हा सुरुवातीच्या काळात देशातील विविध भागात टोळया करून राहत असावा. शिकार करणे व हत्यार तयार करणे ही पुरुषांची कामे होती.

फळे व कंदमुळे गोळा करण्याचे काम स्त्रिया करीत असाव्यात असे दिसते. मानव हा भटकत असला तरी ऊन व पावसापासून संरक्षण होण्यासाठी तो शिल्पाश्रयांचा सहारा घेत होता. मध्यप्रदेशातील नर्मदेच्या खोऱ्यात मोठमोठी शिल्पाश्रये आढळून आली. नवाश्मयुगात मानव झोपडी करून राहू लागला, त्यामुळे त्यांच्या जीवनात स्थैर्य प्राप्त झाले.

**2. घरे:-**

पुराश्मयुगातील मानवाने निवारा म्हणून गुहा व शिल्पाश्रयांचा सहारा घेतला असावा असे दिसते. देशातील चंबळ, नर्मदा व कर्नाटकातील मलप्रभा इ. नद्यांच्या खोऱ्यातील गुहांचा सहारा मानवाने ऊन व पावसापासून बचावासाठी केला असावा. परंतु भारतातील हवामान उष्ण व दमट असल्याने मानव उघड्यावरच भटकत राहिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

नवाश्मयुगात मात्र मानव झोपडी करून एकाच ठिकाणी राहू लागला; तत्कालीन घराचे अवशेष कश्मीर व आंध्र प्रदेशात मिळाले आहेत. कश्मीरमधील लोक हवामान थंड असल्याने जमिनीत घरे करून राहत होते. श्रीनगरच्या उत्तरेला बुर्झाहोम येथे जमिनीत घरे सापडली आहेत. जमिनीतील खड्ड्यांची घरे गोलाकार होती. या खड्ड्यावर छप्पर उभारले जात असे. खड्ड्याच्या भिंती मातीने लिंपलेल्या असत. या घरात खापराचे तुकडे व हाडांची अवजारे आढळून आली. घर खोदून दोन घरे एकमेकांना जोडली जात असे. हत्यारे, आयुधे व अन्न अशा घरात सुरक्षित राहण्यासाठी ठेवली जात असत. नवाश्मयुगीन दक्षिण भारतातील शेतकरी झोपडीत राहत असत. आंध्रप्रदेशातील ग्रॅनाइटच्या प्रचंड प्रस्तराचा उपयोग मानवाने निवारा म्हणून केला. घरात रांजणात धान्य साठवून ठेवत असत .घरे गोलाकार असून त्याला कुडाच्या भिंती असत . पशुधन हेच नवाश्मयुगीन लोकांची मालमत्ता होय. त्यासाठी स्वतंत्र गोठे असत.

**3. अन्न:-**

पुराश्मयुगीन मानव भटक्या अवस्थेत राहत होता. तो प्राण्यांची शिकार करून कच्चे मांस खात असावा. कंदमुळे व फळे यांचाही उपयोग अन्न म्हणून केला जात असावा. नंतरच्या काळात मात्र मानव प्राण्यांचे मांस भाजून खाऊ लागला. पुराश्मयुगीन भारतात उत्तरेतील सोहन नदीच्या खोऱ्यात जंगली हत्ती होते. तसेच मध्य प्रदेश व दक्षिण भारतात वनगाय, गेंडा, हत्ती हे प्राणी भटकत असलेले दिसतात. या सर्व प्राण्यांचे मांस मानव खात होता.

मध्याश्मयुगात हत्यारांचा आकार लहान परंतु अत्यंत धारदार व टोकदार झाला होता. पूर्वीच्या आकाराने मोठी असलेली हत्यारे मध्ययुगात नाहीशी झाली होती. या युगातील हत्यारांच्या आकारावरून समजते की या काळातील मानव लहान लहान प्राणी जसे हरीण, माकड व रानडुकरे या चपळ प्राण्यांची शिकार करून त्यांचे मांस खात असावा. कंदमुळे, फळे यांचाही अन्न म्हणून उपयोग होत असे.

नवाश्मयुगात मानवाच्या आहारात विविधता आली. या काळात काळवीट, मुंगूस, गेंडा, हरिण, नीलगाय यासारखे प्राणी होते . मासे, कंदमुळे, फळे मानव खात असे. या काळात कुत्रा हा प्राणी मानवाला शिकारीच्या कामात मदत करीत असे. नवाश्मयुगात मानव झोपडी करून राहू लागला. त्यामुळे त्याच्या जीवनात स्थिरता प्राप्त झाली म्हणून नंतरच्या काळात मानव हा केवळ शिकारीवर अवलंबून राहिला नाही तर तो या काळात शेती करू लागला. दक्षिण भारतातील उत्खननातील प्राप्त झालेल्या अवशेषांवरून असे अनुमान काढता येते की, तेथील शेतकरी गळितांच्या धान्याचे उत्पादन घेत असावे. म्हैसूरमधील टेक्कलकोटा येथील शेतकरी कुळीताचे उत्पन्न काढीत असे. या काळातील मानव अन्न शिजवून खात असे. पिकलीहाळ याठिकाणी गाय, बैल व मेंढ्या या जनावरांची हाडे उत्खननात आढळून आली यावरून त्या जनावरांच्या मासांचा उपयोग खाण्यासाठी निश्चितच केला जात असावा असा निष्कर्ष काढता येतो.

श्रीनगरच्या उत्तरेस बुर्झाहोम या ठिकाणी जमिनीत खड्डे खोदून केलेल्या घरच्या तोंडाशी चूल व राख आढळून आली. तसेच धान्याचे पीठ करण्यासाठी लागणारे साधन पाटा व वरवंटा मिळाले. यावरून स्पष्ट होते की या काळातील जीवन स्थिर व समृद्धशाली बनले होते .

**4. शेती:-**

नवाश्मयुगातील अर्थव्यवस्थेचे शेती व पशुपालन हे दोन प्रमुख महत्त्वाचे घटक होत. काश्मीरमधील शेतकरी सुरुवातीच्या काळात शेतीची लागवड कशा प्रकारे करत असावा याबद्दल केवळ अंदाज व्यक्त करता येतो. त्याठिकाणी प्राप्त झालेल्या दगडी व हाडांच्या विळ्यांवरून तेथील शेतकरी पीक काढत असावा असे लक्षात येते. दक्षिण भारतातील शेतकरी गळिताची धान्ये व कुळीतांचे पीक घेत असावा. जमिनीवरील झाडे, झुडपे तोडून काढून ती साफ केली जात असत. नंतर तिचा शेती करण्यासाठी उपयोग होत असे. शेती ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असे. जमीन उकरण्यासाठी दगडी फाळ आणि धारदार लाकडी काठ्या दगडी कड्यात बसवून तिचा वापर केला जात असे.

**5. विणकाम / वेशभूषा:-**

जुन्या अश्मयुगाच्या काळात मानव नग्नावस्थेतच फिरत होता. तथापि, नवाश्मयुग काळात मात्र त्याला सुती कापडाचे व कापडापासून वस्त्रे शिवण्याचे ज्ञान प्राप्त झालेले असावे. उत्खननात भाजलेल्या मातीच्या टकळीच्या चात्या सापडलेल्या आहेत . त्यावरून मानवाला या काळात वस्त्र विणण्याचे ज्ञान प्राप्त झाले होते असे निश्चितपणे सांगता येते. तथापि, त्यांच्या वस्त्रांविषयी काहीही माहिती मिळत नाही. उत्खननात आढळून आलेल्या काही अवशेषांवरून अश्मयुगीन विणकामाविषयी अनुमान काढता येते. नवाश्मयुगात टोपल्या सुद्धा विणल्या जात असाव्यात. नवाश्मयुगातील काही भांड्यावर व त्यांच्या बुडावर विणलेल्या चटईचे ठसे दिसून येतात. यावरून नवाश्मयुगात विणकाम प्रगतीपथावर असाव असे म्हणता येते.

**6. मातीची भांडी/ मृद\भांडी:-**

मध्याश्मयुगातील दगडी व लाकडाची भांडी अद्याप उत्खननातून मिळालेली नाहीत. तथापि, मातीची भांडी मात्र मोठ्या प्रमाणावर उत्खननातून प्राप्त झालेली आहेत. भारतातील या काळातील मृदभांडी राखी रंगाची व विविध आकाराची आढळतात. शेतीचा शोध लागल्यानंतर धान्य साठविण्यासाठी मातीची भांडी बनवण्याची गरज मानवाला निर्माण झाली असावी. मृदभांडी बनविण्याचा शोध प्रथम पश्चिम आशियात लागलेला असावा. ही भांडी तयार करण्यासाठी प्रारंभी मोठे कष्ट पडत असत. भांडे घडविताना ते प्रथम हातावर फिरवावे लागे. आंध्रप्रदेशात शेतकऱ्यांनी घाटदार मातीची भांडी बनविण्यासाठी एक साधी पद्धत शोधली होती. मोठ्या रांजणाच्या बुडाचा तुकडा घेऊन त्यावर मातीचा गोळा ठेवीत. रांजणाचा हा तुकडा फिरविला की वरच्या मातीचा गोळा फिरत असल्याने त्याला हवा तो आकार देता येत असे.

या मृदभांड्यात चंबु, तोटीची भांडी, छिद्रयुक्त भांडी, कप, कटोरे इत्यादी प्रमुख आकार आढळतात. नवाश्मयुगीन भांड्यावर कोरीव नक्षीकाम केलेले दिसते. या भांड्यांना घासून चमकदार केले जात होते. या मृदभांड्यांपैकी काही भांड्यांच्या काठावर तांबड्या गेरूचा पट्टा ओढलेला दिसतो. अश्मयुगात या भांड्यांचा साठवणुकीसाठी उपयोग केला जात असावा असे मानता येते. यानंतर ताम्रपाषाण युगात कुंभाराच्या चाकाचा शोध लागल्यामुळे त्यावर भांडी आकर्षक व सुबक बनवण्यात येऊ लागली भांडी घासून चकचकीत केली जात असत.

**7. अलंकार:-**

उत्खननात मिळालेल्या अवशेषांवरून अश्मयुगीन मानवाला अलंकाराची आवड होती असे दिसते. अश्मयुगातील अलंकाराचे अवशेष भारतात सापडले नाहीत. तथापि, गुजरातमधील मध्याश्मयुगीन मानवास डेन्टॅलियम शंखाचे दागिने आवडत होते. अशा प्रकारचे शंख समुद्रकिनाऱ्यावरून मिळवावे लागत असत. नवाश्मयुगीन मानव विभिन्न प्रकारचे दागदागिने वापरत असे. गोमेदाचे आणि शंखाचे मणी, भाजकी माती, हस्तिदंती, संगजिऱ्याच्या दगडा पासून बनविलेले मणी नवाश्मयुगीन मानव वापरत असे. दक्षिणेतील उत्खननात काही ठिकाणी सोन्याचेही मणी आढळतात.

**8. अश्मयुगीन हत्यारे:-**


पुराश्मयुगीन सुरुवातीच्या काळातील हत्यारे दगडा पासून बनवलेले असून ती ओबडधोबड होती. हत्यारे - बिलोरी ; दगड, लाकडापासून तसेच प्राण्यांच्या हाडांपासून तयार केली जात असत. हिंस्र प्राण्यांपासून स्वतःचे रक्षण करणे व प्राण्यांची शिकार करणे यासाठी

हत्यारांचा उपयोग केला जात होता. पुराश्मयुगात हात कुऱ्हाड व फरशी ही दोन प्रमुख हत्यारे होती. नंतर चपटी हत्यारे बनवण्यात आली. त्यांना शेलियन हत्यारे म्हणतात. मध्याश्मयुगीन हत्यारे आकाराने लहान टोकदार व धारदार होती ती चर्ट जातीच्या दगडापासून तयार केली जात असत. तासण्या व छन्नीसारखे हत्यार प्रभावी होते.

मध्याश्मयुगातील हत्याराचा आकार लहान होता. त्यांना "सूक्ष्मास्त्रे" असे म्हणता येईल . जी गारेच्या दगडापासून तयार करीत असत . हत्यारे अर्धचंद्राकृती, त्रिकोणी व चतुष्कोणी असत. ती एखाद्या दांड्यात किंवा हाडात बसविली जात असत. नवाश्मयुगीन हत्यारे घासून गुळगुळीत केलेली असत. कुऱ्हाडी , छन्नी आणि वाकस ही या युगातील दगडी हत्यारे होती .



नवाश्मयुगीन हत्यारे



पुराश्मयुगीन हत्यारे



मध्याश्मयुगीन हत्यारे ("सूक्ष्मास्त्रे")


**9. पाळीव प्राणी:-**

अश्मयुगीन मानवाला प्राण्यांची शिकार करूनच अन्न मिळवावे लागत होते .मानव प्राण्यांचे कच्चे मांस खात असे. वनगाय, गेंडा, हत्ती, घोडा, उंट व लांडगा इत्यादी प्राण्यांचे मांस मानव खात होता. नवाश्मयुगात पशुपालन ही मानवाची मालमत्ता ठरली. मानव अनेक प्राण्यांना पाळू लागला .कुत्रा या जंगली प्राण्यांची मदत शिकारीसाठी मानवाला होऊ लागली. गाय, बैल, मेंढ्या, डुकरे व शेळया हे प्राणी मानव पाळत असे. पिकलीहाळ (म्हैसूर) येथे वरील प्राण्यांची हाडे सापडली यावरून या प्राण्यांची पैदास शेतकरी करीत असावा. नवाश्मयुगात

अशा पाळीव प्राण्यांसाठी मोठमोठे गोठे मानव बनवीत असत. आंध्रप्रदेशातील ऊटनुर याठिकाणी 207 फूट लांबीचा व 15 फूट रुंदीचा एक मोठा गोठा सापडला असून या गोठ्यात लहान लहान विभाग पाडले आहेत. बैल, मेंढ्या व डुकरासाठी वेगवेगळी व्यवस्था असावी. रात्रीच्या वेळी जनावरांचा शेणकूट जाळून पाळीव प्राण्यांचे व वस्तीचे हिंस्र पशूंपासून संरक्षण केले जात असे.

**10. अश्मयुगीन मानवाच्या वसाहती किंवा स्थळे:-**

पूर्वश्मयुगातील मानव हा भटक्या अवस्थेत जीवन जगत असल्यामुळे तो भारतात सर्वत्र फिरला. पूर्वाश्मयुगीन हत्यारे देशात गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि मद्रास प्रांतात सापडली. नर्मदा नदीचे खोरे, पंजाब, राजपुताना, मध्यभारत, बंगाल, आसाम, बिहार, ओरिसा, दक्षिणेतील कोकणपट्टी, कर्नाटकातील मलप्रभेचे खोरे, म्हैसूर प्रदेश आणि कर्नाटकातील बेल्लारी, उत्तर अर्काट,चिंगलपूरव , कर्नुल जिल्हा या ठिकाणी अश्मयुगीन मानवाचे अस्तित्व असल्याचे दिसून येते .



**11. धार्मिक जीवन:-**

अश्मयुगीन मानवाच्या धार्मिक जीवनात जादूटोण्याचा प्रभाव असावा. मरणोत्तर जीवनाविषयीही त्यांचा विश्वास होता असे दिसते. गुजरातमध्ये मध्याश्मयुगाच्या काळात मृताचे काळजीपूर्वक दफन केले जात होते. घरातील मृत व्यक्तीची आपणावर कृपादृष्टी व्हावी व तो आपल्या सान्निध्यात असावा या जाणिवेतून मृताला राहत्या घरी पुरले जात असे. मिर्झापूर जिल्ह्यातील काही दफनात मृत व्यक्तींच्या शेजारी दगडी हत्यारे, खापरी भांडी ठेवलेली दिसतात. नवाश्मयुगात या धर्मकल्पनेत आणखीनच बदल झाला. दफनासाठी वस्तीमध्ये स्वतंत्र जागा ठेवण्यास सुरुवात झाली. कश्मीरमधील बुर्झाहोम येथे नवाश्मयुगीन दफनाचा पुरावा मिळतो. काही वेळा संपूर्ण मृत शरीर खड्डा करून पुरलेले आढळते तर काही वेळा खड्ड्यात त्यांच्या अस्ती ठेवलेल्या दिसतात. क्वचित कवटीला भोक पाडण्याची पद्धतही होती. या काळात शेती व पशुपालन हेच प्रमुख व्यवसाय बनल्याने त्यांच्याशी संबंधित असलेल्या देवदेवतांना ही महत्त्व मिळाले. प्राणी व पशु यांनाही देवता मांनण्यास सुरुवात झाली असावी. बुर्झाहोम येथे कुत्रा, लांडगा ,काळवीट इत्यादींचे काळजीपूर्वक दफन केलेले दिसते. या पशूंना देवता मानण्याच्या परंपरेमुळेच या दफनाविषयी विशेष काळजी घेतलेली दिसून येते.





**12. अश्मयुगीन कला:-**

भारतात आंध्रप्रदेश, केरळ व मध्य प्रदेशातील भीमबेटका येथे आढळणाऱ्या चित्रकलेच्या अवशेषांवरून या काळातील समाजाने कलेच्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीची माहिती मिळते .या चित्रात कोरीव आकृत्या दिसतात. चित्रांचे एकावर एक थर दिसतात. यात प्रामुख्याने शिकारीची चित्रे काढलेली आहेत. चित्रातील आकृत्या प्रथम दगडी अणकुचीदार हत्याराने कोरून काढीत. नंतर त्यात रंग भरीत असावेत. निसर्गात उपलब्ध होणारा गेरू, झाडाची साल,पाने, फुले या पासून रंग बनविण्याचे मानवाला ज्ञान होते. या चित्रांचा धार्मिक संकल्पनांशी ही संबंध असावा. नवाश्मयुगाच्या काळात कलेच्या बाबतीत आणखीनच प्रगती झाली. या काळातील मिळालेल्या कलावशेषात मातीच्या मूर्ती, मातीच्या भांड्यावरील रंगीत काम, काही प्रस्तर खंडावर कोरलेली व रंगवलेली चित्रे आढळतात. त्यात पक्षांची, बैलाचे चित्रे आहेत. याशिवाय सामूहिक नृत्य, हत्ती, साप, मगर यांची चित्रे, शिकारीची चित्रे आहेत. ही चित्रे व मातीच्या भांड्यावरील नक्षीकाम व त्यांना दिलेले रंग, क्वचित मिळणाऱ्या मातीच्या मूर्ती यावरून या समाजाने कलेच्या क्षेत्रात प्रगती केली होती असे मानता येते .





**ऐतिहासिक मुल्यमापन :-**

अश्मयुगीन मानवाच्या सांस्कृतिक जीवनाकडे पाहिल्यास प्रारंभी नग्न अवस्थेत, अन्न मिळवण्यासाठी भटकणारा मानव आपल्या बुद्धीच्या जोरावर अवतीभवतीच्या निसर्गावर मात करण्यामध्ये यशस्वी झाला. त्याने हत्यारांचा शोध लावला. या हत्यारांना धारदार करण्यात व त्यात आवश्यक ते बदल करण्याच्या तंत्रात त्यांनी यश मिळवले. बदलत्या गरजा नुसार त्याने आपल्या हत्यारांमध्येही बदल केले. शेतीच्या शोधानंतर तर त्याच्या जीवनाला आणखी स्थैर्य मिळाले. भटकण्याची ही त्याला गरज राहिली नाही. त्यातूनच त्याच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवनातही बदल होत गेला. कला क्षेत्रातही तो प्रगती करू लागला. अन्न मिळविण्यासाठी भटकणारा मानव अन्नोत्पादक बनल्याने त्याच्या सांस्कृतिक विकासाला चालना मिळाली असे दिसून येते. त्यामुळेच अश्मयुग ही मानवी जीवनातील प्रगतीची पहिली अवस्था होय. यानंतरच्या काळातील धातूयुगात मानवी जीवन अधिक उत्क्रांत व प्रगत होत गेले असे दिसते.

## संदर्भासाठी जास्तीची माहिती

**भारतात मानवाच्या विकासाच्या पाच अवस्था:-**

1.रामपेथिकस मानव

2.आस्ट्रेलोपिथेकस मानव

3.होमो इरेक्टस मानव

4. निॲंडरथल मानव

5. होमोसेपिएन मानव .

**भूवैज्ञानिक सारणी:-**

- पृथ्वीच्या भूवैज्ञानिक सारणीला महाकल्प (Eras) असे म्हणतात.
- महाकल्पाच्या चे विभाजन कल्प (Periods) मध्ये करण्यात येते.
- प्रत्येक कल्पाचे (periods)चे विभाजन अनेक युगात ( Epochs ) मध्ये करतात.
- पृथ्वीच्या अंतिम महाकल्पाला नूतन जीवन महाकल्प (Cenozoic Era) म्हणतात.

**प्रागैतिहासिक उपकरणे:-**

- दगडाला सतत घासून एका विशिष्ट अवस्थेत तोडले जाते त्यास कोर (core)असे म्हणतात.
- दगडाचे लहान लहान तुकडे पाडण्यात येतात त्यास शल्क म्हणजेच Flakes म्हणतात.
- घर्षण करून हत्यारावर धार बनवण्यात येते तेव्हा शल्क एक भागाकडून काढण्यात येतात. तेव्हा धार एकाच भागाकडे तीव्र बनते तेव्हा अशा उपकरणास गॅडस Chopper म्हणतात .
- जेव्हा धार दोन्ही बाजूस बनवण्यात येते त्यास Chopping Tool खंडक उपकरणे असे म्हणतात.
- दगडी हत्यारांचा पार्श्वभाग एका जागी मिळण्याऐवजी वळणदार बनतो अशा उपकरणास विदारणी म्हणजेच Cleaver म्हणतात.
- शल्काचा धारदार भाग टोकावर असेल तर त्याला scraper म्हणजेच खुरचणी म्हणतात.
- कोणत्याही शल्क प्रारूपास वेधणी Point असे म्हणतात.

**सोहन संस्कृतीची हत्यारे :-**

पंजाब व काश्मीर येथे जी वैशिष्ट्यपूर्ण हत्यारे मिळालेली आहेत त्यांना **सोहन संस्कृतीची हत्यारे** अशी संज्ञा दिली जाते. दगडी गोट्याच्या एका बाजूचे किंवा क्वचित दोन्ही बाजूचे कपचे काढून त्याचे सरळ धार असलेले हत्यार तयार केले जात होते. अशा वैशिष्ट्यपूर्ण

पद्धतीची हत्यारे आग्नेय आशिया व चीनमध्ये मिळतात. सोहन पद्धतीची ही हत्यारे नदीकाठी जमिनीत ज्या थरात मिळाली त्याचा अभ्यास करून कश्मीर व पंजाब या प्रदेशात चार हिमयुगे व तीन आंतर -हिमयुगे झाली असावी , हीमयुगातील अतिशय थंड वातावरण मानवी वस्तीला योग्य नव्हते . पहिल्या आंतर - हिमयुगाच्या काळात वातावरणात बदल झाल्यानंतर मानव या प्रदेशात वास्तव्य करू लागला .पुढील काळातील गरजेनुसार त्याने लहान पण जास्त प्रभावी हत्यारे बनवण्यास सुरुवात केली. तो मानव कोणत्या वंशाचा होता हे निश्चितपणे सांगता येत नाही. पिण्याच्या पाण्याची गरज व शिकारीसाठी उपयुक्त ठिकाण म्हणूनच त्याने नदीकाठी वास्तव्य केले असावे .

**2. ॲबेव्हिनियन किंवा शेलियन हत्यारे:-**

काश्मीर व पंजाबच्या प्रदेशाशिवाय भारतात इतर ठिकाणी जो मानव राहत होता, त्याची हत्यारे वेगळ्या पद्धतीची आहेत. ही हत्यारे ओबड-धोबड असत. दगडाचे मोठाले कपचे काढल्यामुळे ती हत्यारे ओबडधोबड बनत. त्यांना ॲबेव्हिनियन किंवा शेलियन हत्यारे म्हणतात . या हत्यारांमध्ये हात कुऱ्हाडी व फरशी यांचा समावेश आहे. ती क्वार्टझाईट नावाच्या दगडापासून बनविलेली असत. पुढील काळात मानवाने या हत्यार बनविण्याच्या तंत्रात प्रगती केली. तो चपटी व सुबक हत्यारे बनवू लागला, ती हत्यारे ॲश्युलियन पद्धतीची हत्यारे म्हणून ओळखली जातात. या दोन्ही प्रकारची हत्यारे भारतात गुजरात, महाराष्ट्र, म्हैसूर, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, मद्रास इत्यादी प्रांतात मिळालेली आहेत. या दोन्ही प्रकारची दगडी हत्यारे नदीकाठी असलेल्या मातीच्या थरात सापडतात.

उत्तरपुराश्मयुगामध्ये चर्ट व जस्पर यासारख्या टणक व एकसंघ दगडा पासून बनवलेली हत्यारे वापरली जात. जी लहान व धारदार असत. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे या गावी ही हत्यारे उत्खननातुन प्राप्त झालेली आहेत .

## वस्तुनिष्ठ प्रश्न

**प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

1. मानवाला लेखन कला अवगत होण्याच्या अगोदर चा कालखंड म्हणजे -----------------------------कालखंड होय.

अ) आद्य इतिहास ब) प्रागैतिहासिक क) ऐतिहासिक कालखंड ड) उत्तर वेदिक

2. 1851 मध्ये ------------------------यांनी सर्वप्रथम ‘ प्रागैतिहास ‘ या संज्ञेचा वापर केला.

अ) डॅनियल विल्सन ब) प्रिम रोझ क) स्टुअर्ट पिगॉट ड) रॉबर्ट ब्रुस फुट

3. -------------------- यांनी “प्री- हिस्टोरिक इंडिया” हा ग्रंथ 1950 साली प्रसिद्ध केला.

अ) रॉबर्ट ब्रुस फुट ब) प्रिम रोझ क) स्टुअर्ट पिगॉट ड) डॅनियल विल्सन

4. सुक्ष्मास्त्रे ही -------------------------------प्रमुख वैशिष्ट्य म्हणुन ओळखले जाते.

अ) पुराश्मयुगाचे ब) मध्याश्मयुगाचे क) नवाश्मयुगाचे ड) आद्य इतिहास

5.------------------------या काळात मानवाला चाकाचा शोध लागला.

अ) पुराश्मयुग ब) मध्याश्मयुग क) नवाश्मयुग ड) उत्तर वेदिक युग

6. ग्राम संस्कृतीची म्हणजेच गावांच्या वसाहतींची सुरुवात ----------------------युगात झाली होती.

अ) पुराश्म ब) मध्याश्म क) नवाश्म ड) उत्तर वेदिक

7. कोर / फ्लेक प्रणालीची हत्यारे ----------------------- या दगडाने बनवलेली दिसून येतात.

अ) क्वार्टझाईट ब) जस्पर क) एगत ड) सिडनी

**योग्य पर्याय:** 1. ब) प्रागैतिहासिक 2. अ) डॅनियल विल्सन 3. क) स्टुअर्ट पिगॉट

4. ब) मध्याश्मयुगाचे 5. क) नवाश्मयुग 6. क) नवाश्म 7. अ) क्वार्टझाईट

**प्रश्न 2. योग्य जोड्या जुळवा.**

| अ. क्र. | अ गट | ब गट |
|---|---|---|
| 1 | जर्मनी, फ्रान्स | चाकाचा शोध |
| 2 | पुराश्मयुग | सोहन संस्कृतीची हत्यारे |
| 3 | रॉबर्ट ब्रुस फुट | गुहा/ शैल- चित्रे |
| 4 | पंजाब व काश्मीर | निअँडरथल / क्रोमॅग्नन मानव |
| 5 | नवाश्मयुग | पुराश्मयुगीन दगडी हात कुऱ्हाडीचा शोध |
| 6 | भीमबेटका | अजस्त्र प्राणी |

**योग्य जोड्या**

1. जर्मनी, फ्रान्स- निअँडरथल / क्रोमॅग्नन मानव 2. पुराश्मयुग- अजस्त्र प्राणी
3. रॉबर्ट ब्रुस फुट- पुराश्मयुगीन दगडी हात कुऱ्हाडीचा शोध 4. पंजाब व काश्मीर - सोहन संस्कृतीची हत्यारे
5. नवाश्मयुग- चाकाचा शोध 6. भीमबेटका - गुहा/ शैल- चित्रे

**लघुत्तरी प्रश्न**

**प्रश्न 3. टिपा लिहा**

1. प्रागैतिहास
2. पुराश्मयुग
3. मध्याश्मयुग
4. अश्मयुगीन हत्यारे

**दीर्घोत्तरी प्रश्न**

**प्रश्न 4. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

1. अश्मयुगीन संस्कृतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
2. नवाश्मयुगीन मानवाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.